पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक - **१६/०१/२०१५** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/०१/२०१५** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
५) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
७) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे - सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) कामाचे ठिकाणामध्ये बदल करणेबाबत - मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर येथे अंतर्गत जलनि:सारण नलिका टाकणेबाबत - मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) कामाचे जागेमध्ये बदल करणेबाबत - मा.समीर मासुळकर, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत दापोडी बोपखेल येथील प्रभाग क्र.६४ मधील जलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेबाबत - मा.समीर मासुळकर, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) वॉर्ड क्र.३१ मध्ये वाय.सी.एम.हॉस्पिटल पी.एम.सेंटरजवळ प्रतिक्षागृह बांधणेचे कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा.समीर मासुळकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) सभावृत्तांत कायम करणेबाबत - मा.प्रभाकर वाघेरे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) अंदाजपत्रकास एकत्रित मान्यते बाबत - मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणेबाबत पुढील सभेच्यावेळी विचार करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

.---------

ठराव क्रमांक : ६८ विषय क्रमांक : १

दिनांक : १६/०१/२०१५ विभाग - आकाशचिन्ह व परवाना

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/८०२/२०१४, दि.३०/१२/२०१४

विषय - सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता उद्योगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी चे दरवाढीस मान्यता मिळणेबाबत.....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ६९ विषय क्रमांक : २

दिनांक : १६/०१/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

किवळे येथील औंध रावेत रस्ता ते बाप्देवनगर (सिध्दीविनायक कॉलनी) दरम्यानच्या नाल्याच्या कडेने १८.०० मी. रुंदी डि.पी.रस्ता विकासित करणे. (निविदा क्र.२/५३/२०१२-१३) या कामांतर्गत किवळे येथील १८.०० मी. रुंद नाल्याच्या कडेने डि.पी.रस्ता विकसीत करावयाचे काम आहे. तथापि सदर ठिकाणी रस्त्यासाठी ताब्यात असलेल्या जागेत रस्त्याचे काम पूर्ण करणेत आले असून उर्वरित जागा ताब्यात घेण्याच्या कार्यवाहीस विलंब होत असलेमुळे सद्यस्थितीत सदर साईट उपलब्ध नाही. तरी सदर कामातून विकासनगर, किवळे, उत्तमनगर, दांगटवस्ती, भिमाशंकर नगर, सरपंचवस्ती, दत्तनगर, साई कॉलनी, इ. तसेच मामुर्डी येथील साईनगर, आझादनगर, आदर्शनगर, इ.ठिकाणचे अंतर्गत रस्त्यांचे काम करणेत यावे. तरी सदर कामाच्या जागेत बदल (Chang of Site) करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७० विषय क्रमांक : ३

दिनांक : १६/०१/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.३७ येथे बालाजीनगर झोपडपट्टी असून सदर झोपडपट्टीत सार्वजनिक शौचालये अपुरी आहेत. त्यामुळे तेथील झोपडीधारक उघडयावर जातात त्यामुळे सदर ठिकाणी अनारोग्य परिस्थिती निर्माण होत आहे. सदर झोपडीधारकांना वैयक्तीक शौचालय बांधणेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी झोपडपट्टीत अंतर्गत रस्त्यावर जलनि:सारण नलिका टाकणे आवश्यक आहे. तरी सदरचे काम कासारवाडी मैला शुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.३७ महात्माफुलेनगर येथे अंतर्गत जलनि:सारण नलिका टाकणे कामातून करुन घेणेस येणारा सुधारित अंदाजित र.रु.४९,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) चे सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७१ विषय क्रमांक : ४

दिनांक : १६/०१/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.विमल जगताप

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.३८ नेहरुनगर येथे ओ.पी.डी.इमारतीच्या पहिल्या मजल्यावर विरंगुळा केंद्र बांधणे हे निविदेचे काम निविदा क्र.१२/३/२०१३-१४ रक्कम रुपये - २४,९९,१८६/- हे मे.रुणुका कन्स्ट्रक्शन यांना मिळाले आहे. परंतु सदरील इमारतीचे विस्तारकरणे हे काम बांधकाम परवानगी विभागाच्या नियमात बसत नसल्याने सदरील कामातून ओ.पी.डी. इमारतीची व नेहरुनगर परिसरातील स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७२ विषय क्रमांक : ५

दिनांक : १६/०१/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.विमल जगताप

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.६४ दापोडी - बोपखेल मध्ये झोपडपट्टी असून सदर झोपडपट्टीत सार्वजनिक शौचालये अपुरी आहेत. त्यामुळे तेथील झोपडीधारक उघडयावर जातात. त्यामुळे सदर ठिकाणी अनारोग्य परिस्थिती निर्माण होत आहे. सदर झोपडीधारकांना वैयक्तीक शौचालय बांधणेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी व सार्वजनिक शौचालयाचा मैला उघडयावर वाहत असलेने अनारोग्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून जलनि:सारण नलिका टाकणे आवश्यक आहे. सदरचे काम कासारवाडी मैला शुध्दीकरण केंद्रांतर्गत दापोडी - बोपखेल येथील प्रभाग क्र.६४ मधील

जलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेचे कामातून करुन घेणेस येणारा सुधारित अंदाजित र.रु.४९,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) चे सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७३ विषय क्रमांक : ६

दिनांक : १६/०१/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव -

मे.भूमी कन्स्ट्रक्शन हे निविदा क्र.२१/८-२०१२/१३ अन्वये काम करीत आहेत. सदर कामामध्ये वॉर्ड क्र.३१ मध्ये वाय.सी.एम. हॉस्पिटल पी.एम. सेंटरजवळ प्रतिक्षागृह बांधणेचे कामाचा समावेश आहे. कामाची निविदा रक्कम रुपये - १८,६७,३९०/- इतकी आहे. सदर निविदेमधील ९५% इतके काम पूर्ण झाले असून प्रतिक्षागृहामधील व पोस्ट मार्टेम परिसरातील उर्वरित कामे अपुरी आहेत. सदर उर्वरित कामे पूर्ण करणेसाठी वॉर्ड क्र.३१ मध्ये वाय.सी.एम. हॉस्पिटल पी.एम. सेंटरजवळ प्रतिक्षागृह बांधणेचे कामास र.रु.४३,००,०००/- ( अक्षरी र.रु.त्रेचाळीस लाख फक्त) चे सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७४ विषय क्रमांक : ७

दिनांक : १६/०१/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव -

मा.विधी समितीमार्फत मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभेकडे शिफारस करुन जाणारे विषय मा.विधी समिती सभेचा सभावृत्तांत कायम झाले शिवाय पुढे पाठविणेत येऊ नयेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७५ विषय क्रमांक : ८

दिनांक : १६/०१/२०१५

सुचक : मा.प्रभाकर वाघेर अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकानुसार कामे करण्याकरीता अंदाजपत्रकास एकत्रितपणे प्रशासकीय मान्यता देणेऐवजी प्रत्येक कामानुसार मा.विधी समितीची मान्यता घेऊन संबंधित विभागाने कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३५ /२०१५
दिनांक : १७/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-14-15\proceeding 11_Vidhi.doc